# अभंग - ज्ञानेश्वरी

## अध्याय चौथा

[१]श्रवणेन्द्रियासी । आज उजाडलें । निधान देखिलें । गीतारूप ॥१॥
आतां हा संसार । झाला मोक्षमय । स्वप्न चि हें होय । साचाऐसें ॥२॥
ज्ञानाचा विचार । आधीं च मधुर । वरी वक्ता थोर । जगजेठी ॥३॥
आणि भला श्रोता । भक्तराज पार्थ । योग आला येथ । आगळा हा ॥४॥
व्हावा सुगंधित । कोकिळेचा स्वर । ना तरी मधुर । पुष्प-गंध ॥५॥
मग तेथें जैसा । आनंदाचा भर । तैसा हा सुंदर । कथाभाग ॥६॥
कैसी कथारूपी । अमृताची गंगा । जोडली ही जगा । थोर भाग्यें ॥७॥
किंवा श्रोतेजनीं । जप-तपें केलीं । तींच फळा आलीं । गीतारूपें ॥८॥
सर्व इंद्रियांनीं । आतां सर्वां परी । श्रवणाच्या घरीं । रिघोनियां ॥९॥
श्रीहरी-पार्थाचा । संवाद [२]गीताख्य । तयाचें चि सौख्य । भोगावें हें ॥१०॥
[३]प्रसंग सोडोन । पुरे हा पाल्हाळ । संवाद रसाळ । [४]निवेदीन ॥११॥
तदा रायालागीं । म्हणे तो संजय । थोर भाग्य होय । अर्जुनाचें ॥१२॥
कीं तो कृष्णनाथ । तयासवें येथ । [५]संवादे अत्यंत । प्रेमभरें ॥१३॥
पिता वसुदेव । देवकी जननी । तयां हि बोलोनि । दावी ना जें ॥१४॥
बंधु बलराम । नेणे वार्ता ज्याची । बोले गुह्य तें चि । अर्जुनाशीं ॥१५॥
रमादेवी नित्य । सन्निध ती राहे । परी पाहे ना हें । प्रेम-सुख ॥१६॥
हरि-प्रेम पूर्ण । बहरलें साच । लाभलें ह्यासी च । आज येथें ॥१७॥

---

१ कानांला.   २ गीता नांवाचा.   ३ ओघ; कथाभाग.   ४ सांगेन.   ५ बोलतो.

*सनकादिकांनीं । इच्छिलें उदंड । प्रेम हें अखंड । भोगावया ।।१८।।
केली पराकाष्ठा । परी त्यांची आशा । [१]येणें [१]पाडें यशा । नाहीं आली ।।१९।।
पार्थाचिया ठायीं । श्रीहरीचें प्रेम । मज [२]निरुपम । दिसतसे ।।२०।।
तेणें कैसें केलें । पुण्य सर्वोत्तम । संवादे हा प्रेम–। भरें देव ।।२१।।
तयाचिया प्रीती–। साठीं निराकार । होवोनि साकार । अवतरे ।।२२।।
पार्थ कृष्णाठायीं । तल्लीन म्हणोनि । वाटती हे दोन्ही । एकरूप ।।२३।।
एऱ्हवीं हा देव । वळेना योग्यांसी । तेविं वेदार्थासी । कळेना हा ।।२४।।
ध्यानाची हि दृष्टि । पोहोंचेना जेथें । तो चि आज येथें । [३]साकारला ।।२५।।
देवांचा हि देव । अनादि [४]निष्कंप । नित्य आत्मरूप । असे तरी ।।२६।।
कैशापरी देखा । पार्थासी प्रसन्न । झाला भक्ताधीन । तो हा येथें ।।२७।।
वस्त्राची ज्या घडी । मोडितां साचार । त्रैलोक्य-विस्तार । दिसूं लागे ।।२८।।
तो हा निराकार । परी आकारला । देहधारी झाला । पार्थासाठीं ।।२९।।

श्रीभगवानुवाच–
इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ।।१।।

मग देव म्हणे । आम्ही हा चि योग । सांगितला [५]साङ्ग । सूर्यालागीं ।।३०।।
परी ह्या गोष्टीसी । आतां बहु दिन । सहजें लोटून । गेले पार्था ।।३१।।
*विवस्वान सूर्यें । ही च योगस्थिति । सर्व *मनुप्रति । निरूपिली ।।३२।।
मनूनें आपण । आचरोनि चांग । शिकविली मग । *इक्ष्वाकूतें ।।३३।।
*परंपरा ऐसी । पार्था पुरातन । विस्तारली जाण । असे येथें ।।३४।।

एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।
स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ।।२।।

जाणिला आणिक । पुढें राजर्षींनीं । परी नेणे कोणी । आतां ह्यातें ।।३५।।
विषयांचे ठायीं । प्रीति अनिवार । वाढली साचार । प्राणियांची ।।३६।।
ठेविती आसक्ति । देहीं च म्हणोनि । गेले विसरोनि । आत्मबोध ।।३७।।

---

*परिशिष्ट पहा. १ इतक्या प्रमाणांत. २ अप्रतिम. ३ (सगुण) रूप घेता झाला. ४ अढळ. ५ पूर्णपणे.

देखें आस्थाबुद्धि । गेली आडवाटे । सार्थक तें वाटे । भोगसुखीं ॥३८॥
जाहला संसार । हा चि जीवप्राण । तयांलागीं जाण । धनुर्धरा ॥३९॥
जे का * दिगंबर । तयांचिया गांवीं । काय तीं करावीं । उंची वस्त्रें ॥४०॥
सांगें धनंजया । [1] जन्मांध जो होय । काय सूर्योदय । तयालागीं ॥४१॥
किंवा बहिऱ्यांच्या । सभेमाजीं जाण । कोण देई मान । संगीतासी ॥४२॥
ना तरी कोल्ह्यासी । चांदण्याची वेळ । कैसी आवडेल । सांगें मज ॥४३॥
नभीं चंद्रोदय । नाहीं झाला तों च । ज्यांची असती च । दृष्टि लोपे ॥४४॥
तयां कावळ्यांसी । चंद्राची ओळख । कैसी व्हावी देख । धनुर्धरा ॥४५॥
तैसी वैराग्याची । न देखती शींव । नेणती जे नांव । विवेकाचें ॥४६॥
सांग बरें मज । सर्वेश्वराप्रति । कैसे ते पावती । मति-मंद ॥४७॥
नेणों कैसा मोह । वाढला [2] साप्रंत । तेणें गेला व्यर्थ । दीर्घ काळ ॥४८॥
म्हणोनि हा योग । सर्वथा ह्या लोकीं । [3] लोपला [4] विलोकीं । धनंजया ॥४९॥

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥३॥

तो चि हा निभ्रांत । तुजप्रति आतां । वर्णिला तत्त्वतां । * कर्म-योग ॥५०॥
जीवींचें हें गुज । तुजपासोनियां । कैसें ठेवूं प्रिया । लपवोनि ॥५१॥
प्रेमाची तूं मूर्ति । भक्तीचें जीवन । सख्यत्वाचा प्राण । तूं चि एक ॥५२॥
आतां तुज काय । ठकवावें येथ । संबंध निकट । तुझा-माझा ॥५३॥
असों जरी आम्ही । रणांगणीं येथें । तरी साहोनि तें । क्षणभरी ॥५४॥
आधीं तुझें लागे । हरावें अज्ञान । पार्था, उपेक्षून । गलबला ॥५५॥

अर्जुन उवाच–
अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥४॥

तंव बोले पार्थ । कृपानिधे हरी । माय बाळावरी । करी प्रेम ॥५६॥
तरी सांगें येथ । कायसा [5] विस्मय । तूं चि एक माय । अनाथांची ॥५७॥

---

१. जन्मतःच आंधळा. २ आतां; हल्ली. ३ नाहींसा झाला. ४ पहा. ५. आश्चर्य.

[१] संसार-श्रांतांची । साउली तूं मोठी । तुझ्या कृपेपोटीं । जन्म आम्हां ।।५८।।
माता जरी व्याली । पांगळें [२]अपत्य । तरी साहे नित्य । भार त्याचा ।।५९।।
प्रभो, तैसा आहे । येथें हि प्रकार । तुजपुढें फार । काय बोलूं ।।६०।।
कृपानिधे आतां । पुसेन जें कांहीं । ऐकोनि तें घेईं । [४]सावधान ।।६१।।
तेवीं चि आशंका । घेतली म्हणोनि । नको आणूं मनीं । राग त्याचा ।।६२।।
पाहें तुझे बोल । ऐकोनि [३] क्षणैक । जाहलें साशंक । मन माझें ।।६३।।
कीं तो * विवस्वान । वाडवडिलां हि । ठाउका चि नाहीं । कोण काय ।।६४।।
तरी तुवां देवा । केव्हां कैसा त्यास । केला उपदेश । सांगें मज ।।६५।।
ऐकें विवस्वान । तो तरी प्राचीन । तूं तंव श्रीकृष्ण । सांप्रतचा ।।६६।।
म्हणोनि ही गोष्ट । वाटे [५]विसंगत । साशंकलें चित्त । ह्या चि लागीं ।।६७।।
तेविं तुझी देवा । अगाध ती लीला । कळेना आम्हांला । सर्वथैव ।।६८।।
म्हणोनियां जें हें । सांगसी तूं मातें । केविं म्हणों खोटें । एकाएकीं ।।६९।।
तरी तुवां कैसा । रवीलागीं भला । उपदेश केला । पूर्वकाळीं ।।७०।।
सर्व तो वृत्तांत । मज उमजेल । ऐशापरी बोल । कृपावंता ।।७१।।

श्रीभगवानुवाच–
बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ।।५।।

तंव तो श्रीकृष्ण । म्हणे पंडुसुता । जिये काळीं होता । विवस्वान ।।७२।।
नसों तदा आम्ही । तुज भ्रांति ऐसी । तरी तूं नेणसी । अर्जुना हें ।।७३।।
अनेक ते जन्म । तुझे-माझे झाले । परी तूं आपुले । नाठविसी ।।७४।।
ज्या ज्या वेळीं जे जे । माझे अवतार । सर्व ते साचार । स्मरतसें ।।७५।।

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ।।६।।

म्हणोनि हें मज । आठवे सकळ । कार्य तें मागील । धनंजया ।।७६।।
असोनि * अजन्मा । घेतों अवतार । येथें वारंवार । * मायायोगें ।।७७।।

---

१ संसारानें कष्टी झालेल्यांची.　२ मूल.　३ लक्ष देऊन.　४ क्षणभर; कांहींसे.　५ न जुळणारी.

अविनाशीपण । न लोपतां माझें । दिसे येथें जें जें । होणें जाणें ।।७८।।
[१] प्रतिबिंबे सर्व । माझ्या चि तें ठायीं । माया-योगें पाहीं । धनुर्धरा ।।७९।।
स्वतंत्रता माझी । न लोपे ती जाण । परी कर्माधीन । ऐसा [२] वाटें ।।८०।।
अर्जुना सकळ । भ्रांतीचा तो खेळ । असें मी केवळ । जैसातैसा ।।८१।।
दर्पणीं तें जैसें । प्रतिबिंब दिसे । एक वस्तु भासे । दोहों ठायीं ।।८२।।
मूळ वस्तूचा त्या । करितां विचार । असे का साचार । दुजें रूप ।।८३।।
तैसा जरी पार्था । असें निराकार । करोनि स्वीकार । प्रकृतीचा ।।८४।।
जगत्कार्यासाठीं । होतसें साकार । [३] नटें अवतार । घेवोनियां ।।८५।।

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ।।७।।

युगायुगीं सर्व । धर्म संरक्षावे । ओघ हा स्वभावें । [४] आद्य असे ।।८६।।
म्हणोनियां जेव्हां । जेव्हां धर्मालागीं । आक्रमी [५] सर्वांगीं । अधर्म हा ।।८७।।
तेव्हां ठेवीं माझें । *अजत्व हि दूर । [६] नाठवीं साचार । * अव्यक्तत्व ।।८८।।

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।८।।

आपुल्या भक्तांचा । घेवोनि कैवार । येतों अवतार । धरोनियां ।।८९।।
मग अज्ञानाचा । गिळोनि काळोख । सीमा तोडीं देख । अधर्माची ।।९०।।
उभारितों संतां–। हातीं सौख्य-ध्वज । फाडितों सहज । पाप-लेख ।।९१।।
करोनियां दैत्य–। कुळाचा संहार । साधूंसी सत्कार । देववितों ।।९२।।
धर्म-नीति ह्यांची । करोनियां भेट । दोघांसी हि गांठ । बांधितों मी ।।९३।।
अविवेकरूपी । फेडोनियां [७] मसी । विवेक-दीपासी । उजळितों ।।९४।।
तदा स्वानंदाची । दिवाळी साचार । होय निरंतर । योगियांसी ।।९५।।
आत्म-सुखें विश्व । भरोनियां जाई । धर्म चि तो पाहीं । नांदे जगीं ।।९६।।
आणि-भक्तजन । सत्त्वगुणें जाण । होती परिपूर्ण । पंडु-सुता ।।९७।।
पाप लया जातें । पुण्य उजाडतें । जेव्हां प्रकटते । मूर्ति माझी ।।९८।।

---

* परिशिष्ट पहा. १ भासतें. २ वाटतों. ३ नटतो. ४ मूळचाच. ५ सर्व बाजूंनी.
६ विसरतों. ७ काजळी.

ह्या चि काजालागीं । धनंजया जाण । होतों अवतीर्ण । युगायुगीं ॥९९॥
परी हें चि तत्त्व । ओळखे जो जगीं । तो चि भक्त योगी । ज्ञानवंत ॥१००॥

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वत: ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥९॥

असोनि अजन्मा । कैसा घेईं जन्म । * अक्रिय मी कर्म । कैसें करीं ॥१०१॥
स्वभावें संपूर्ण । जयासी हें ज्ञान । तो चि पार्था जाण । मुक्तश्रेष्ठ ॥१०२॥
नसे देहभाव । जरी देहधारी । [१] वर्ततो [१] व्यापारीं । [१] अनासक्त ॥१०३॥
मग माझिया चि । * स्वरूपीं तत्त्वतां । मिळे तो पावतां । * पंचत्वातें ॥१०४॥

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिता: ।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागता: ॥१०॥

कोणत्या गोष्टीचा । करिती ना शोक । होती पार्था देख । निष्काम जे ॥१०५॥
क्रोधाचिया मार्गे । कदापि न जाती । संतत [२] मत्प्राप्ति–। संपन्न जे ॥१०६॥
सेवेसाठीं साच । राहिले जिवंत । आत्मबोधें तुष्ट । नि:संग जे ॥१०७॥
तपें तेज:पुंज । तपस्वी जे पूर्ण । एक चि ठिकाण । ज्ञानासी जे ॥१०८॥
तीर्थासी हि जेणें । येई पवित्रता । तीर्थरूप स्वतां । होती जे का ॥१०९॥
स्वभावें ते झाले । मद्रूप चि पार्था । मुक्ति *सायुज्यता । मेळवोनि ॥११०॥
तयां-माझ्यामध्यें । उरे ना अंतर । म्हणोनि साचार । एकरूप ॥१११॥
कलंक कालिमा । नष्ट होतां पूर्ण । पितळ ती जाण । सुवर्ण चि ॥११२॥
* यमनियमांच्या । [३] कसीं उतरोन । झाले जे पावन । तपोज्ञानें ॥११३॥
पावले ते तैसे । साच मद्रूपता । जाण पंडु-सुता । नि:संदेह ॥११४॥

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्या: पार्थ सर्वश: ॥११॥

भजती जे जैसे । पार्था माझ्याठायीं । तयां भजें मी हि । तैसा चि गा ॥११५॥
माझिया ठायीं च । मनुष्यमात्राची । वृत्ति भजनाची । स्वाभाविक ॥११६॥
परी नाहीं ज्ञान । म्हणोनि नाशले । तेणें चि पावले । बुद्धिभेद ॥११७॥

---

१ अलिप्तपणे व्यवहार करतो. २ माझ्याशी मिळून गेलेले. ३ परीक्षेंत. * परिशिष्ट पहा.

मग मी जो एक । साच धनंजया । तेथें [१] कल्पोनियां । अनेकत्व ॥११८॥
देखती ते भेद । अभेदाचे ठायीं । नाम देती पाहीं । *अनाम्यासी ॥११९॥
देव देवी ऐसें । म्हणोनियां मातें । देखें *अचर्चातें । चर्चिती ते ॥१२०॥
असतां सर्वत्र । सारिखा अखंड । उच्चनीच भेद । पाहती ते ॥१२१॥
भ्रांत-बुद्धीचिया । होवोनि आधीन । ऐशापरी जाण । बोलती ते ॥१२२॥

काङ्क्षन्त: कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवता: ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥१२॥

मग नाना हेतु । धरोनियां मनीं । [२] विधिविधानांनीं । [३] नानाविध ॥१२३॥
यथोचित त्यांची । करिती [४] अर्चना । मानोनियां नाना । देवतांतें ॥१२४॥
आणिक सर्वथा । जें जें अपेक्षित । तें तें चि समस्त । पावती ते ॥१२५॥
परी तें केवळ । कर्मफळ जाण । निश्चयेंकरोन । धनुर्धरा ॥१२६॥
पाहूं जातां साच । दुजें देतें घेतें । नसे कोणी येथें । कर्मावीण ॥१२७॥
देख ज्याचें त्याचें । कर्म चि निभ्रांत । फळा येई येथ । मृत्युलोकीं ॥१२८॥
पेरावें जें तें चि । अंकुरे क्षेत्रांत । दिसे दर्पणांत । पहावें तें ॥१२९॥
गिरिकंदरांत । आपुली च वाणी । उठे प्रतिध्वनि–। रूपें जैसी ॥१३०॥
तैसा उपासना–। मार्गीं ह्या सकळ । असें मी केवळ । *साक्षीभूत ॥१३१॥
येथें ज्याची जैसी । असेल भावना । तैसें तो अर्जुना । फळ पावे ॥१३२॥

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागश: ।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥१३॥

पार्था *गुणकर्म–। विभागानुसार । [५] सृजिले मीं चार । * वर्ण ऐसे ॥१३३॥
विविध प्रकृती । भिन्न भिन्न गुण । ध्यानीं ते आणून । धनुर्धरा ॥१३४॥
चार हि वर्णांच्या । धर्मांची व्यवस्था । स्वभावें सर्वथा । केली मीं च ॥१३५॥
मानव तेथोनि । सर्व हि ते एक । चतुर्वर्णात्मक । परी झाले ॥१३६॥
ऐशा रीती गुण–। कर्माचा विचार । केला मीं साचार । सहजें चि ॥१३७॥
वर्णभेदाची ही । व्यवस्था ऐसी च । म्हणोनि मी साच । नव्हें कर्ता ॥१३८॥

---

१ मानून. २ धर्मशास्त्राच्या नियमांप्रमाणे. ३ निरनिराळ्या. ४ पूजा. ५ निर्माण केले.
* परिशिष्ट पहा.

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥१४॥

**माझिया सत्तेनें । जाहलें हें पार्था । परी मीं सर्वथा । नाहीं केलें ॥१३९॥**
**माझें अकर्तृत्व । जाणिलें हें ज्यानें । कर्माचीं बंधनें । नाहीं त्याला ॥१४०॥**

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥१५॥

**पार्था पूर्वकाळीं । मातें *मुमुक्षूंनीं । ऐसा ओळखोनि । केलीं कर्में ॥१४१॥**
**भाजलेलीं बीजें । पेरिलीं भूमींत । [1]नाहीं जैसीं येत । अंकुरत्वा ॥१४२॥**
**तैसीं कर्में तीं च । परी होती जाण । मोक्षासि कारण । सर्वथैव ॥१४३॥**
**पार्था *कर्माकर्म–। विवेक हा येथें । नाकळे बुद्धीतें । ज्ञात्याच्या हि ॥१४४॥**

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥१६॥

**कर्म ऐसी संज्ञा । कवणातें जाण । किंवा काय खूण । अकर्माची ॥१४५॥**
**धनंजया ह्याचा । पाहतां विचार । ज्ञाते हि साचार । घोंटाळती ॥१४६॥**
**जैसें खोटें नाणें । जणूं खरें वाटे । घाली संदेहीं तें । दृष्टिलागीं ॥१४७॥**
**मनाच्या संकल्पें । दुजी सृष्टि जाण । कराया निर्माण । समर्थ जे ॥१४८॥**
**कर्मासी नैष्कर्म्य । मानोनियां भ्रमें । बद्ध होती कर्में । ते हि तैसे ॥१४९॥**
**सर्वज्ञ जे द्रष्टे । ते हि होती मूढ । नेणत्याचा [2]पाड । काय तेथें ॥१५०॥**
**कर्म-अकर्माचा । म्हणोनि विवेक । सांगतसें ऐक । तो चि आतां ॥१५१॥**

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥१७॥

**स्वभावतां जेणें । आकारतें विश्व । तयातें चि नांव । 'कर्म' ऐसें ॥१५२॥**
**पार्था कर्माचें त्या । [3]यथार्थत्वें ज्ञान । व्हावें लागे जाण । आधीं येथें ॥१५३॥**
**मग वर्णाश्रम–। धर्मासी उचित । कर्म जें विहित । विशेषत्वें ॥१५४॥**
***'विकर्म' तें पार्था । जाणावें निश्चित । सर्वथा [4]साद्यन्त । फलासह ॥१५५॥**

---

१ रुजत नाहींत. २ योग्यता. ३. अचूकपणें; वस्तुतः. ४ पूर्णपणे.
* परिशिष्ट पहा.

[1]'निषिद्ध' जें कर्म । तें हि येथें मग । ओळखावें चांग । धनुर्धरा ॥१५६॥
कर्माकर्माचें हें । जाणतां स्वरूप । जीव आपोआप । बंधमुक्त ॥१५७॥
नाहीं तरी सारें । विश्व कर्माधीन । ऐसी चि गहन । [2]व्याप्ति ह्याची ॥१५८॥
परी असो आतां । देईं अवधान । सांगेन लक्षण । मुक्ताचें त्या ॥१५९॥

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥१८॥

साक्षित्वें सकळ । कर्मीं वावरतां । देखे *नैष्कर्म्यता । आपुली जो ॥१६०॥
आचरितां कर्म । नसे फलासक्ति । जयाचिया चित्तीं । लेशमात्र ॥१६१॥
आत्मरूप जग । म्हणोनियां पाहीं । कर्तव्य तें कांहीं । नुरे जया ॥१६२॥
नैष्कर्म्यावस्थेचा । ऐशापरी चांग । बोध झाला [3]साङ्ग । जयालागीं ॥१६३॥
तरी हि जो कर्मे । आचरे सकळ । होवोनि केवळ । साक्षीभूत ॥१६४॥
धनंजया ऐशा । लक्षणांनीं युक्त । तो चि जाण मुक्त । सर्वथैव ॥१६५॥
जैसा जळापाशीं । जो का उभा ठाके । जळीं जरी देखे । आपणासी ॥१६६॥
तरी तो निभ्रांत । ओळखे आपण । आहों जळाहून । वेगळे चि ॥१६७॥
किंवा जळीं नाव । चालतां वेगांत । बैसोनियां तींत । जाय जो का ॥१६८॥
[4]थडियेचे वृक्ष । धांव घेती ऐसें । तयालागीं दिसे । तेथोनियां ॥१६९॥
परी वस्तुस्थिति । पाहतां सकळ । वृक्ष ते अचळ । ऐसें म्हणे ॥१७०॥
तैसें सर्व कर्मीं । वर्ततां निःशंक । मानोनि तें देख । भासात्मक ॥१७१॥
मग आत्मरूप । ओळखे आपण । नैष्कर्म्याची खूण । जाणे ऐसी ॥१७२॥
न चालतां जैसें । सूर्याचें चालणें । उदयास्त होणें । दिसे येथें ॥१७३॥
तैसा आपणातें । जाणे कर्मातीत । सर्व हि कर्मांत । वावरतां ॥१७४॥
जैसें भानु-बिंब । बुडे ना जळांत । तैसा उपाधींत । सांपडे ना ॥१७५॥
मानवाचें रूप । जरी दिसे त्याचें । तरी जाण साचें । ब्रह्म चि तो ॥१७६॥
न पाहतां त्यानें । देखिलें हें विश्व । न करितां सर्व । केलें त्यानें ॥१७७॥
न भोगितां सर्व । भोगिले गा भोग । ऐसा तो सर्वाङ्ग–। परिपूर्ण ॥१७८॥

---

* परिशिष्ट पहा. १ शास्त्राने मनाई केलेले. २ पसारा; व्यापकपणा. ३ पूर्ण. ४ कांठावरचे.

[१] एकदेशी तरी । सर्वत्र तो गेला । असो विश्व झाला । स्वयें चि तो ॥१७९॥

यस्य सर्वे समारम्भा: कामसंकल्पवर्जिता: ।
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहु: पण्डितं बुधा: ॥१९॥

ज्याच्या ठायीं नाहीं । कर्माचा [२] विषाद । तरी [३] फलास्वाद । नसे चित्तीं ॥१८०॥
पार्था आणिक हें । कर्म मी करीन । किंवा संपवीन । आरंभिलें ॥१८१॥
येणें संकल्पें हि । जयाचें गा मन । विटाळे ना जाण । लेशमात्र ॥१८२॥
सर्व हि कर्मांची । जेणें ऐशा रीती । टाकिली आहुती । ज्ञानाग्नींत ॥१८३॥
मानवाच्या रूपें । आकारलें जाण । तें चि पार्था पूर्ण । परब्रह्म ॥१८४॥

त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रय: ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति स: ॥२०॥

देखें सर्वथैव । देहीं जो उदास । फळभोगीं आस । नाहीं ज्यासी ॥१८५॥
अखंड उल्हासें । जो का रात्रंदिन । जाहला तल्लीन । * आत्मानंदीं ॥१८६॥
संतोषाच्या घरीं । * स्वबोध-पक्वान्नें । जेवितां न म्हणे । पुरे ऐसें ॥१८७॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रह: ।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥२१॥
यदृच्छालाभसंतुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सर: ।
सम: सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥२२॥

देह-अहंभाव । सोडोनि संपूर्ण । आशा ओंवाळून । टाकोनियां ॥१८८॥
चढत्या वाढत्या । आवडीनें कैसा । ब्रह्मसुख-रसा-। स्वाद घेई ॥१८९॥
म्हणोनि प्रसंगें । जें जें होय प्राप्त । तेणें चि संतुष्ट । राहे सदा ॥१९०॥
जयाचिया चित्तीं । आपपरभाव । नसे [४] सर्वथैव । धनुर्धरा ॥१९१॥
ऐके तें तें स्वयें । होवोनियां राहे । आणि जें जें पाहे । तें हि तो चि ॥१९२॥
चाले पायीं मुखें । बोले तें आपण । सर्व क्रिया जाण । तो चि झाला ॥१९३॥
होतां आत्मरूप । विश्व चि संपूर्ण । कर्म तें कवण । बाधे तया ॥१९४॥
झाला निर्मत्सर । स्वभावें तो पाहें । शब्दें सांगावें हें । लागे काय ? ॥१९५॥

---

* परिशिष्ट पहा. १ मर्यादित. २ खंत; खेद. ३ फलप्राप्तीची गोडी. ४ पूर्णपणे.

म्हणोनियां पार्था । सर्वथा तो मुक्त । कर्मीं कर्मातीत । ओळखावा ॥१९६॥
असोनि *सगुण । होय *गुणातीत । संशय तो येथ । नसे कांहीं ॥१९७॥

गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥२३॥

देहधारी तरी । दिसे तो *निर्गुण । चैतन्यासमान । धनंजया ॥१९८॥
ब्रह्मस्वरूपाचा । [1]लावोनियां [1]कस । पाहतां तयास । भला चोख ॥१९९॥
ऐसा मुक्त परी । कौतुकें तो देख । करी यज्ञादिक । कर्में जरी ॥२००॥
तरी तीं निःशेष । तयाच्या चि ठायीं । [2]लीन होती पाहीं । स्वभावें चि ॥२०१॥
अकाळींचे मेघ । वर्षल्यावांचोन । सहजें विरोन । जाती जैसे ॥२०२॥
तैसीं यथाविधि । आचरे समस्त । सर्वथा विहित । कर्में जरी ॥२०३॥
तरी तीं अर्जुना । पावती ऐक्यातें । नाहीं दुजे तेथें । म्हणोनियां ॥२०४॥

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥२४॥

यज्ञीं मी याज्ञिक । हवन हें एक । भोक्ता तो आणिक । दुजा कोणी ॥२०५॥
ऐसा बुद्धिलागीं । नाहीं भेदभाव । [3]हविर्मंत्र सर्व । तो चि झाला ॥२०६॥
ऐसें जें जें सर्व । यज्ञ-अनुष्ठान । पाहे तो संपूर्ण । ब्रह्मरूप ॥२०७॥
तयाचें तें कर्म । ब्रह्मरूप होतां । करोनि अकर्ता । सर्वथा तो ॥२०८॥

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥२५॥

विवेकतारुण्य । ज्यांसी प्राप्त झालें । ज्यांनीं लग्न केलें । विरक्तीशीं ॥२०९॥
मग *जीवब्रह्म-। ऐक्य-योगाग्नीची । उपासना साची । आरंभिली ॥२१०॥
रात्रंदिन यज्ञ–। कर्मीं जे निमग्न । *सोऽहं हंसः खूण । *गुरु-वाक्य ॥२११॥
त्या चि [4]हुताशनीं । मनासह ज्यांनीं । आहुति देवोनि । अविद्येची ॥२१२॥
योगरूप अग्नि–। होत्र स्वीकारिलें । याज्ञिक ते भले । धनंजया ॥२१३॥
दैवयज्ञ ऐसें । यज्ञासी ह्या नाम । आत्मसुख-काम । पुरवी जो ॥२१४॥

---

*परिशिष्ट पहा.   १ परीक्षा घेऊन.   २ मिळून जातात.   ३ यज्ञांतील आहुति आणि मंत्र.   ४ अग्नींत.

आतां अवधारीं । सांगेन आणिक । जे का उपासक । ब्रह्माग्नीचे ॥२१५॥
स्वयें ब्रह्मरूप । होवोनि आपण । सर्व ब्रह्मार्पण । करिती ते ॥२१६॥

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयामाग्निषु जुह्वति
शब्दादीन्विषयानन्ये इंद्रियाग्निषु जुह्वति ॥२६॥

संयमाग्निहोत्री । आणिक ते एक । *मूळबंधादिक । त्रिबंधांनीं ॥२१७॥
[१]संयमाग्निमाजीं । करिती हवन । सर्व हि पावन । इंद्रियांचें ॥२१८॥
वैराग्याचा सूर्य । उगवतां कोणी । कुंडें तीं रचोनि । संयमाचीं ॥२१९॥
तेथें इंद्रियाग्नि । करितां प्रकट । ज्वाळा निघे नीट । विरक्तीची ॥२२०॥
तो चि विकारांचें । पेटलें सर्पण । पांची कुंडांतून । इंद्रियांच्या ॥२२१॥
आशारूपी धूर । निघोनियां जातां । अग्नि प्रज्वाळतां । तयामाजीं ॥२२२॥
मग ते कौशल्यें । विधियुक्त देती । बहुत आहुती । विषयांच्या ॥२२३॥

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥२७॥

ऐशापरी कोणी । अंतरींचे दोष । क्षाळिले नि:शेष । [२]गुडाकेशा ॥२२४॥
तेविं अवधारीं । कोणी आणिकांनीं । घेवोनि *'अरणी' हृदयाची ॥२२५॥
तेथें विवेकाचा । *'मंथा' बळकट । बांधियेला नीट । शांतपणें ॥२२६॥
धीरवृत्तीनें तो । धरोनि दाबून । केलें घुसळण । गुरु-वाक्यें ॥२२७॥
समरसें ऐसें । करितां मंथन । सफळ साधन । झडकरी ॥२२८॥
साधना ती होतां । ह्यापरी संपूर्ण । [३]झालें [३]उज्जीवन । [३]ज्ञानाग्नीचें ॥२२९॥
*ऋद्धि-सिद्धींचा जो । मोहरूपी धूर । आधीं गेला पार । [४]निवर्तोनि ॥२३०॥
मग ज्ञानाग्नीचा । स्फुल्लिंग बारीक । दिसूं लागे देख । तेजोमय ॥२३१॥
यमनियमांनीं । निर्दोष जें मन । शुष्क पेटवण । तें चि झालें ॥२३२॥
ऐसें आयतें च । लाभतां जळण । मग ज्वाळा पूर्ण । प्रकटली ॥२३३॥
त्या चि ज्वाळेमाजीं । होमिल्या विविधा । समृद्ध *समिधा । वासनांच्या ॥२३४॥
अहं-ममत्वाचें । ओतोनियां [५]घृत । होतां चि प्रदीप्त । ज्ञानाग्नि तो ॥२३५॥

---

*परिशिष्ट पहा. १ मन-इंद्रियें ताब्यांत ठेवणे. २ अर्जुना. ३ ज्ञानरूप अग्नि पेटला. ४ निघून. ५ तूप.

इंद्रियकर्मांच्या । आहुती तयांत । देती ते [1] दीक्षित । सोऽहं-मंत्रें ॥२३६॥
प्राण-कर्मरूप । *स्रुवे'च्या सहित । देतां ज्ञानाग्नींत । *पूर्णाहुति ॥२३७॥
ऐक्यबोधरूप । *'अवभृथस्थान' । तेथें घडे जाण । सहजें चि ॥२३८॥
संयमाग्निमाजीं । इंद्रिय-कर्मांचें । हवन तें साचें । होतां मग ॥२३९॥
आत्मसुखरूपी । उरे [2] हुतशेष । तो चि *'पुरोडाश' । भक्षिती ते ॥२४०॥
कोणी ऐशा रीती । करोनि यजन । पावले निर्वाण । त्रिभुवनीं ॥२४१॥
यज्ञक्रिया ऐशा । जरी भिन्न भिन्न । [3] प्राप्य वस्तु जाण । एक चि ती ॥२४२॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे ।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतय: संशितव्रता: ॥२८॥

एका 'द्रव्ययज्ञ' । ऐसी देती संज्ञा । नाम एका यज्ञा । 'तपोयज्ञ' ॥२४३॥
'योगयज्ञ' ऐसा । बोलिला आणिक । 'वाग्यज्ञ' हें देख । नांव एका ॥२४४॥
तेथ शब्दानें चि । शब्दाचें हवन । होतें उच्चारून । वेदमंत्र ॥२४५॥
जेथ ज्ञानद्वारा । आकळे तें ब्रह्म । तया यज्ञा नाम । 'ज्ञानयज्ञ' ॥२४६॥
सकळ हे यज्ञ । अत्यंत कठिण । ह्यांचें अनुष्ठान । दुर्घट कीं ॥२४७॥
परी जितेंद्रिय । आले जे संसारीं । ते चि *अधिकारी । जाण येथें ॥२४८॥
यज्ञ-अनुष्ठानीं । प्रवीण ते भले । योग-बळें झाले । सुसंपन्न ॥२४९॥
म्हणोनियां जीव–। बुद्धीचें हवन । करिती ते जाण । आत्मरूपीं ॥२५०॥

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे ।
प्राणापानगती रुद्‌ध्वा प्राणायामपरायणा: ॥२९॥

कोणी प्राणद्रव्यें । करिती हवन । अभ्यासें अपान–। अग्निमाजीं ॥२५१॥
कोणी एक प्राणीं । अपान अर्पिती । कोणी निरोधिती । दोहींतें हि ॥२५२॥
ऐसें अग्निहोत्र । जे का स्वीकारिती । तयांसी बोलती । *प्राणायामी ॥२५३॥

अपरे नियताहारा: प्राणान्प्राणेषु जुह्वति ।
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषा: ॥३०॥

सर्व आहारांचा । करोनि संयम । *हठयोगक्रम । स्वीकारोनि ॥२५४॥

---

१ यज्ञदीक्षा घेतलेले. २ हवन करून जें शिल्लक राहतें ते. ३ मिळविण्याची.
* परिशिष्ट पहा.

कोणी प्राणाग्नींत । प्राणाचें चि जाण । करिती हवन । उत्कंठेनें ।।२५५।।
ऐसे यज्ञकर्ते । मोक्षेच्छु सकळ । यज्ञें मनोमळ । [1] प्रक्षाळिती ।।२५६।।
अविद्या संपूर्ण । जळोनियां जातां । उरे स्वभावतां । * निजवस्तु ।।२५७।।
तेथें नुरे अग्नि । नुरे यज्ञकर्ता । अनुभवा येतां । ऐक्यभाव ।।२५८।।
जेथें यज्ञकर्ता । होतो पूर्णकाम । सरे यज्ञकर्म । आपोआप ।।२५९।।
जेथोनि माघारें । फिरे क्रियाजात । विचार हि जेथ । प्रवेशे ना ।।२६०।।
जेथें तर्काचा हि । पोहोंचे ना हात । होई ना जें लिप्त । * द्वैत-दोषें ।।२६१।।

यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ।
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्य: कुरुसत्तम ।।३१।।

ऐसें स्वयंसिद्ध । शुद्ध निर्विशेष । जें का यज्ञीं शेष । राहे ज्ञान ।।२६२।।
तें चि ब्रह्मश्रेष्ठ । सेविती पवित्र । *'अहं ब्रह्म' मंत्र । जपोनियां ।।२६३।।
उरे जें यज्ञान्तीं । ऐसें ज्ञानामृत । सेवोनि तें तृप्त । जाहले जे ।।२६४।।
त्यांसी * अमृतत्व । लाभलें म्हणोन । अनायासें जाण । ब्रह्मप्राप्ति ।।२६५।।
जयां जन्मोनियां । संयमाग्निसेवा । घडे ना पांडवा । कदाकाळीं ।।२६६।।
तेविं जे का योग–। याग न करिती । [2] वरी [2] ना विरक्ति । तयांलागीं ।।२६७।।
पार्था नाहीं नीट । जयांचें [3] ऐहिक । काय [4] पारत्रिक । सांगूं त्यांचें ।।२६८।।

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ।।३२।।

असो नानापरी । याग हे अनेक । सांगितले देख । तुजलागीं ।।२६९।।
तयांचें वर्णन । वेदांमाजीं चांग । केलें असे साङ्ग । सविस्तर ।।२७०।।
परी विस्ताराशीं । आम्हां काय काज । जाण ते कर्म-ज । सकळ हि ।।२७१।।
जाणतां यज्ञाचें । रहस्य हें पार्था । पावे ना सर्वथा । कर्मबंध ।।२७२।।

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञ: परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ।।३३।।

नानाविध क्रिया । सांगितल्या ज्यांत । मूळ तें वेदांत । असे ज्यांचें ।।२७३।।

---

१ धुऊन टाकतात. २ माळ घालीत नाहीं. ३ ह्या लोकांतील (जीवन). ४ परलोकांतील.
* परिशिष्ट पहा.

द्रव्य-यज्ञ ऐसें । तयांलागीं नांव । देती ते अपूर्व । स्वर्ग-सुख ॥२७४॥
परी सूर्यापुढें । नक्षत्रांचें तेज । लोपतें सहज । जैशा रीती ॥२७५॥
तैसे पार्था जाण । ज्ञानयज्ञाहून । सर्वथा ते गौण । द्रव्य-यज्ञ ॥२७६॥
परमात्मसुख । निधान लाभावें । अखंड भोगावें । समाधान ॥२७७॥
म्हणोनियां योगी । जें का ज्ञानांजन । बैसले घालोन । नेत्रांमाजीं ॥२७८॥
धांवत्या कर्माचें । जें का प्राप्यस्थान । नैष्कर्म्याची खाण । दाखवी जें ॥२७९॥
आत्मप्राप्तीसाठीं । भुकेले जे होती । साधनें करिती । नानाविध ॥२८०॥
तया साधनांची । सरे जेथें वाट । साधक संतुष्ट । होती जेथें ॥२८१॥
पांगुळली जेथें । कर्माची प्रवृत्ति । अंध झाली दृष्टि । तर्काची हि ॥२८२॥
जेणें इंद्रियासी । स्वभावें साचार । पडला विसर । विषयांचा ॥२८३॥
मनाचें हि जेथें । गेलें मनपण । बोलातें हि मौन । पडे जेथें ॥२८४॥
जयामाजीं *ज्ञेय । प्रत्यक्ष तें भेटे । जेथें [१]पांग [१]फिटे । वैराग्याचा ॥२८५॥
विवेकाचा [२]सोस । तुटोनियां जाय । आत्मप्राप्ति होय । अनायासें ॥२८६॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन: ॥३४॥

बरवें तें ज्ञान । प्राप्त व्हावें ऐसी । उत्कंठा मानसीं । असे जरी ॥२८७॥
तरी सर्वभावें । भजावें संतांसी । माहेर ज्ञानासी । होती जे का ॥२८८॥
तेथें सेवा हा चि । [३]दारवंठा जाण । करावा स्वाधीन । [४]दास्यभावें ॥२८९॥
तन-मन-जीवें । चरणीं लागावें । दास्य तें करावें । नम्रपणें ॥२९०॥
विचारितां त्यांसी । मग [५]अपेक्षित । तें चि कृपावंत । सांगतील ॥२९१॥
पार्था गुरुवाक्य । पडतां श्रवणीं । अखंड *उन्मनी । आत्मबोधें ॥२९२॥

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव ।
येन भूतान्यशेषण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥३५॥

गुरुवाक्योदयें । चित्त मग होय । नि:शंक निर्भय । ब्रह्माऐसें ॥२९३॥
तिये वेळीं पार्था । सर्व भूतजात । आपणांसहित । अखंडित ॥२९४॥

---

१ इच्छा पूर्ण होते. २ तीव्र इच्छा. ३ उंबरठा. ४ सेवावृत्तीने. ५ हवें असलेलें.
* परिशिष्ट पहा.

**माझिया स्वरूपीं । देखसी तत्त्वतां । गुरुकृपें होतां । ज्ञानोदय ।।२९५।।**
**ज्ञानाचा प्रकाश । पडतां चि देख । मोहाचा काळोख । नष्ट होय ।।२९६।।**

अपि चेदसि पापेभ्य: सर्वेभ्य: पापकृत्तम: ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ।।३६।।

**पापाचें आगर । भ्रांतीचा सागर । होसी तूं डोंगर । [१]व्यामोहाचा ।।२९७।।**
**तरी ज्ञानापुढें । तुच्छ तें सकळ । ऐसें ज्ञान-बळ । निर्मळ हें ।।२९८।।**
**श्रेष्ठ निराकार । आत्म-स्वरूपाचा । [२]कवडसा साचा । [३]विश्व-भ्रम ।।२९९।।**
**तो चि जेणें ज्ञानें । विरोनियां जाय । तेथें राहे काय । मनोमळ ।।३००।।**
**साशंकता येथें । सर्वथा वाईट । नाहीं जगीं श्रेष्ठ । ज्ञानाऐसें ।।३०१।।**

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ज्ञानाग्नि: सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ।।३७।।

**पार्था त्रिभुवन । पेटतां सकळ । गगनीं जी धूळ । उधळते ।।३०२।।**
**प्रळय-काळींच्या । वावटळीपुढें । ती हि जेथें उडे । क्षणार्धांत ।।३०३।।**
**तेथें क्षणमात्र । बापुडा तो ढग । टिकेल का सांग । धनुर्धरा ।।३०४।।**
**किंवा पवनाच्या । क्षोभें भडकून । टाकितो जाळून । पाण्यातें हि ।।३०५।।**
**ऐसा प्रळयाग्नि । [४]तृणें काष्ठें काय । दडपला जाय । लेशमात्र ।।३०६।।**

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्ध: कालेनात्मनि विन्दति ।।३८।।

**म्हणोनि असो हें । न घडे कल्पान्तीं । दिसे [५]विसंगति । पाहतां चि ।।३०७।।**
**तरी येथें ज्ञाना–। सारिखें पावन । दुजें नाहीं जाण । नि:संदेह ।।३०८।।**
**चैतन्यासमान । नाहीं च आणिक । तैसें ज्ञान देख । सर्वोत्तम ।।३०९।।**
**तेजीं भास्कराच्या । कसासी लागेल । जरी जळांतील । प्रतिबिंब ।।३१०।।**
**किंवा मुठीमाजीं । मावेल आकाश । जातां धरायास । तयालागीं ।।३११।।**
**ना तरी पृथ्वीचा । करावया तोल । आणिक भूगोल । जरी होय ।।३१२।।**
**तरी च सर्वथा । घडेल उपमा । पार्था सर्वोत्तमा । ज्ञानासी ह्या ।।३१३।।**

---

१ भ्रमाचा; मोहाचा. २ छाया. ३ जगदाभास. ४ गवतानें. ५ विरुद्धपणा; असंबद्धता.

नाना परी ऐसा । करितां विचार । आणि वारंवार । निर्धारितां ॥३१४॥
ज्ञानाचें पावित्र्य । ज्ञानीं च तें मात्र । अर्जुना [१] अन्यत्र । नसे कोठें ॥३१५॥
अमृताची रुची । अमृतासमान । [२] उपमावें ज्ञान । ज्ञानाशीं च ॥३१६॥
बोलोनि अधिक । आतां धनंजया । कां गा वेळ वायां । दवडावा ॥३१७॥
ऐकोनि हें वाक्य । मग म्हणे पार्थ । बोलणें यथार्थ । तुझें देवा ॥३१८॥
परी तें चि ज्ञान । आकळावें कैसें । पुसावें जों ऐसें । धनंजयें ॥३१९॥
तों चि जाणोनियां । त्याचें मनोगत । देव भगवंत । काय बोले ॥३२०॥
म्हणे मी सांगेन । ज्ञानाचें साधन । आतां अवधान । देईं पार्था ॥३२१॥

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ॥३९॥

* निजानंदीं गोडी । लागली म्हणोन । विटे जो संपूर्ण । विषयांसी ॥३२२॥
जयाचिया ठायीं । इंद्रियांसी मान । नसे चि गा जाण । सर्वथैव ॥३२३॥
देई ना जो मनीं । वासनेसी थार । प्रकृति-व्यापार । [३] नेघे माथां ॥३२४॥
* स्वरूप-श्रद्धेचा । घेवोनि संभोग । होय जो का साङ्ग । सुखरूप ॥३२५॥
तया तें चि ज्ञान । येतें [४] धुंडाळीत । पार्था होतें प्राप्त । निश्चयें चि ॥३२६॥
जया ज्ञानामाजीं । शांति अखंडित । राहे ओतप्रोत । भरोनियां ॥३२७॥
अंतरीं तें ज्ञान । होतां चि सुस्थिर । शांतीचा अंकुर । फुटे तेथें ॥३२८॥
आणि आत्मबोध-। विस्तार बहुत । होतसे प्रकट । धनुर्धरा ॥३२९॥
मग पाहे तेथें । तयालागीं देख । शान्ति-सुख एक । निर्धारितां ॥३३०॥
ज्ञानबीजाचा हा । वाढता विस्तार । सांगतां अपार । असो आतां ॥३३१॥

अज्ञश्चाश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥४०॥

स्वरूप-ज्ञानाची । नसे गोडी कांहीं । जयाचिया ठायीं । धनुर्धरा ॥३३२॥
काय म्हणूं तरी । तयाचें तें जिणें । त्याहून मरणें । तें हि भलें ॥३३३॥
असावें एखादें । जैसें [५] ओस [६] गेह । किंवा जैसा देह । प्राणाविण ॥३३४॥

---

१ दुसऱ्या ठिकाणीं. २ तुलना करावी. ३ घेत नाहीं. ४ शोधीत. ५ ओसाड. ६ घर.
* परिशिष्ट पहा.

तैसें ज्ञानहीन । तयाचें जीवन । शून्यवत् जाण । भ्रांतियुक्त ॥३३५॥
नसे तरी नसो । आत्मज्ञानप्राप्ति । परी आस्था चित्तीं । वसे जरी ॥३३६॥
तरी तेथें ज्ञान–। प्राप्तीचा ओलावा । संभवेल जीवा । कदाकाळीं ॥३३७॥
ज्ञान तें राहो च । परी त्याची आस्था । ती हि नसे पार्था । ज्याच्या चित्तीं ॥३३८॥
तो तरी निभ्रांत । सांपडला येथ । सर्वथा आगींत । संशयाच्या ॥३३९॥
अमृत हि परी । नावडे तें देख । ऐसें [१] अरोचक । पडे जेव्हां ॥३४०॥
तेव्हां कळों येतें । सहजें चि जाण । रोकडें मरण । आलें ऐसें ॥३४१॥
तैसा भोगसुखीं । रंगोनियां जाय । धरी ना जो सोय । ज्ञानाची ह्या ॥३४२॥
ऐसा मदोन्मत्त । संशयें तो ग्रस्त । जाहला निभ्रांत । ऐसें मानीं ॥३४३॥
सांपडतां मग । ऐसा संशयांत । तयाचा निभ्रांत । नाश होय ॥३४४॥
[२] इह-परलोकीं । नाहीं तया सुख । धनंजया देख । लेशमात्र ॥३४५॥
कळे ना शीतोष्ण । होतां [३] सन्निपात । [४] वन्हि-चंद्रिकेंत । भेद नाहीं ॥३४६॥
संशयें जो तैसा । ग्रासिला सर्वथा । नोळखे तो पार्था । हिताहित ॥३४७॥
चांगलें-वाईट । नोळखे कांहीं च । [५] मिथ्या आणि साच । एक मानी ॥३४८॥
जैसी जन्मांधासी । दिनरात्री नाहीं । तैसें नेणे कांहीं । संशयात्मा ॥३४९॥

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् ।
आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥४१॥

संशयोपासोनि । म्हणोनि आणिक । नाहीं विनाशक । घोर पाप ॥३५०॥
ह्या चि लागीं तोडीं । घातक हा पाश । जिंकोनियां ह्यास । सर्वांआधीं ॥३५१॥
जेथें असे पार्था । ज्ञानाचा अभाव । तेथें ह्यासी ठाव । रहावया ॥३५२॥
अज्ञानाचा गाढ । पडतां अंधार । वाढे अनिवार । मानसीं हा ॥३५३॥
म्हणोनि श्रध्देची । सांपडे ना वाट । पार्था घनदाट । अंधारीं त्या ॥३५४॥
हृदयासहित । ग्रासितां बुद्धीतें । संशयें [६] कोंदाटे । लोकत्रय ॥३५५॥

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥४२॥

---

१ अरुचि. २ ह्या लोकीं. ३ दोषी ताप. ४ आग व चांदणे ह्यांत. ५ खोटें. ६ भरून जातें.

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम चतुर्थोऽध्याय: ।।४।।

ऐसा [१] बळजोर । घोर हा संशय । जिंकाया उपाय । तो चि एक ।।३५६।।
तीक्ष्ण [२] ज्ञान-खड्ग । जरी हाता आलें । तरी कार्य झालें । स्वभावें चि ।।३५७।।
तीव्र ज्ञानखड्गें । तेणें हा संपूर्ण । नष्ट होतो जाण । धनंजया ।।३५८।।
संशय-निरास । होतां मनोमळ । सहज सकळ । नाश पावे ।।३५९।।
७ म्हणोनि संशय । जो हा अंतरींचा । निरास तयाचा । करोनियां ।।३६०।।
आतां धनुर्धरा । ऊठ तूं सत्वर । सर्वथा स्वीकार । धैर्यवृत्ति ।।३६१।।
सर्वज्ञांचा बाप । जो का ज्ञानदीप । होवोनि [३] सकृप । बोले ऐसें ।।३६२।।
संजय तो म्हणे । धृतराष्ट्राप्रति । वृत्तांत हा चित्तीं । घेईं राया ।।३६३।।
असो, श्रीकृष्णाचे । ऐकोनि हे बोल । पार्थ विचारील । प्रश्न भला ।।३६४।।
जो का [४] पूर्वापर–। संबंध पाहोन । समय जाणोन । असे केला ।।३६५।।
तो चि कथाभाग । आतां सुसंगत । जाईल साद्यन्त । सांगितला ।।३६६।।
नाना भावार्थांचा । असे जो का कोष । रसाचा उत्कर्ष । सर्वां परी ।।३६७।।
टाकावे आठ हि । * रस ओवाळून । ऐसी शोभा जाण । असे ज्याची ।।३६८।।
तेविं जगामाजीं । स्थान विश्रांतीचें । असे जो बुद्धीचें । सज्जनांच्या ।।३६९।।
अपूर्व तो शांत–। रस प्रकटेल । जेथें, ऐसे बोल । मराठी हे ।।३७०।।
ऐका सावधान । [५] महार्णवाहून । होती जे गहन । अर्थपूर्ण ।।३७१।।
जरी सूर्यबिंब । बचकेएवढें । प्रकाशा थोकडें । लोकत्रय ।।३७२।।
देखा बोलाची ह्या । तैसी व्यापकता । येईल सर्वथा । प्रत्ययासी ।।३७३।।
किंवा जैसा जो जो । जी जी इच्छा धरी । ती ती पूर्ण करी । कल्पवृक्ष ।।३७४।।
तैसा चि हा बोल । जाणावा व्यापक । तरी द्यावें एक । अवधान ।।३७५।।
असो काय फार । आपणां सांगावें । सर्व हि स्वभावें । जाणतसां ।।३७६।।
करावें श्रवण । देवोनियां चित्त । हीच माझी येथ । विनवणी ।।३७७।।

---

१ दांड्गा. २ ज्ञानरूपी तलवार. ३ कृपायुक्त ४. मागचापुढचा संदर्भ. ५ महासागरातून.
* परिशिष्ट पहा.

सद्गुणी कुलीन । रूपवती नारी । आणि त्या हि वरी । पतिव्रता ॥३७८॥
तैसी [१] सालंकृत । कवित्वरचना । शांतरसें जाणा । शोभतसे ॥३७९॥
आधींच साखर । आवडे बहुत । ती च औषधांत । जरी जोडे ॥३८०॥
तरी सेवूं नये । कां तें वारंवार । सर्वथा साचार । आवडीनें ॥३८१॥
देखा * मलयाद्री–। वरोनि वहात । मंद सुगंधित । येतां वायु ॥३८२॥
जोडला तयासी । अमृताचा [२] स्वाद । आणि मधु नाद । दैवयोगें ॥३८३॥
तरी सर्वांगातें । स्पर्शे शांतवील । स्वादें तोषवील । जिव्हेलागीं ॥३८४॥
नादें कर्णेंद्रिया–। कडोनि साचार । सुखें धन्योद्गार । काढवील ॥३८५॥
तैसें गीतार्थाचें । घडतां श्रवण । तृप्ति परिपूर्ण । कानालागीं ॥३८६॥
आणि अनायासें । संसाराचें दु:ख । लोपेल नि:शंक । [३] आमूलाग्र ॥३८७॥
जरी मंत्रानें च । होय वैरी ठार । वायां कां कट्यार । बाळगावी ॥३८८॥
दूधसाखरेनें । जाय जरी रोग । सेवावा कां मग । कडूनिंब ॥३८९॥
तैसें मनालागीं । रोधिल्यावांचोन । दु:ख दिल्यावीण । इंद्रियांतें ॥३९०॥
येथें अनायासें । लाभतें [४] निर्वाण । घडतां श्रवण । एकलें चि ॥३९१॥
म्हणोनि प्रसन्न । ठेवोनियां मन । ऐका सावधान । गीतार्थ हा ॥३९२॥
ऐसी [५] विज्ञापना । करी श्रोतयांस । निवृत्तीचा दास । ज्ञानदेव ॥३९३॥

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी

चतुर्थोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: ।

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

* परिशिष्ट पहा. १ अलंकार असलेली. २ रुचि. ३ मूळापासून शेंडयापर्यंत. ४ मोक्ष. ५ विनंती.